# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २२/०४/२०१७

## *अवैध दारुची वाहतुक करणारे चारचाकी वाहन सरकार जमा*

सविस्तर वृत्त असे की, दिनांक ११/१२/२०१६ रोजी वाहन मालक चंद्रकुमार मनोहर गुंडावार यांनी आपल्या स्वत:च्या मालकीचे चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.०१ जि.ए. ५८७४ हे अरविंद भांडेकर या इसमास अवैध दारुच्या वाहतुकी करीता दिले. सदरच्या वाहनाने अरविंद हिरामण भांडेकर, महेश सोनवणे, निखील गेडाम आणि शाहु सदावर्ती यांनी उमरेड येथुन अवैध दारु गाडीत भरुन गडचिरोलीला येत असतांना मा. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतिश सिरसाठ व त्यांच्या स्टाफने दिनांक ११/१२/२०१६ रोजी गोगाव फाटयावर नाकाबंदी करुन सदर वाहन तपासले असता, वाहनाच्या डिक्कीमध्ये अवैध दारुच्या बाटलाने भरलेल्या दोन बॅग मिळाल्याने आरोपीसह घटनास्थळ पंचनामा व सदर वाहनाचा जप्ती पंचनामा करुन आरोपींना ताब्यात घेवून पोलीस स्टेशन गडचिरोली येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५(ई), ८३, ९८(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सतिश सिरसाठ यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ. लिना गजभिये यांचा अभिप्राय घेवून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ अन्वये सदर वाहनाने अवैध दारुची वाहतुक केल्यामुळे सदर वाहन सरकार जमा करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये प्राधिकृत अधिकारी मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. मंजुनाथ सिंगे यांच्या कार्यालयात पाठविला व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये राज्य शासनाचे प्राधिकृत अधिकारी म्हणून संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व लेखा पुराव्याच्या आधारे सदर वाहनाने अवैध दारुची वाहतुक होऊन सदर वाहन मालकाने योग्य ती काळजी न घेतल्यामुळे व अप्रत्यक्षरित्या अवैध दारुच्या वाहतुकीमध्ये सहभागीता दर्शविल्यामुळे चंद्रकुमार मनोहर गुंडावार यांच्या मालकीचे चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. ०१ जि.ए. ५८७४ हुंडाई कंपनीचे ACCENT CREDI E ३ सरकार जमा करण्याचे आदेशीत केले.

तरी गडचिरोली जिल्हयात व महाराष्ट्रात अशा प्रकारची पहिलीच कारवाई असल्याने सदर कारवाईमुळे गडचिरोली जिल्हा दारुबंदी असतांना देखील इतर राज्यातून, जिल्हयातून गडचिरोलीमध्ये जी अवैध दारुची वाहतुक होत होती, तसेच अवैध दारुच्या वाहतुकीचे गुन्हे दाखल असणारे वाहने अवैध दारु धंदेवाले संबंधीत वाहने सोडून तिच वाहने अवैध दारु वाहतुकी करीता वारंवार वापरतात. तिला आता प्रभाविपणे आळा बसून आता मात्र या कारवाईमुळे मोठ-मोठे पांढरपेशी गुन्हेगार, पपेट गुन्हेगार उजेडात येवून त्यांच्यावर कारवाई होवून त्यांना मोठा आर्थिक फटका बसेल. परिणामी अवैध दारुच्या धंदयांना प्रभाविपणे प्रतिबंध होईल. सदर जप्त वाहन सरकारजमा होण्याबाबतचा प्रस्ताव मा.

पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साहेबांच्या मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सागर कवडे व तपासी अधिकारी पोउपनि सतिश सिरसाठ यांनी पाठविला होता.




